# विदेशी भाषा अभ्यासक्रम प्रवेशाला मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी रशियन, जर्मन, जपानी, फ्रेंच, पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमा प्रवेशप्रक्रियेला १ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ मिळाली. ऑनलाइन, ऑफलाइन प्रवेश अर्ज भरता येतील.

या विभागातर्फे एक वर्ष कालावधीचे रशियन, जर्मन, जपानी, फ्रेंच, पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात येतात. या अभ्यासक्रमांची प्रवेश अर्हता बारावी उत्तीर्ण असून इतर शिक्षण वा नोकरी करत हे अभ्यासक्रम करता येतात. रोज सायंकाळी एक तास वर्ग असतात. विदेशी भाषांत शिक्षण आणि करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. प्रवेश अर्ज (www.unishivaji.ac.in/Admission2021) वर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभागात संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. मेघा पानसरे यांनी केले.

# संरक्षण क्षेत्रात करिअरच्या संधी : डॉ. नरेंद्र विसपुते

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय संरक्षण क्षेत्रामध्ये करिअरच्या संधी आहेत. त्यासाठी योग्य तयारी करून त्याचा लाभ घेण्यासाठी तरुणांनी प्रयत्न करावे, असे मत मुंबई दूरदर्शन केंद्राचे सहायक संचालक व संरक्षण विभागाचे माजी जनसंपर्क अधिकारी डॉ. नरेंद्र विसपुते (आय.आय.एस.) यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेत 'संरक्षण क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर ते बोलत होते. डॉ. विसपुते यांनी संरक्षण क्षेत्रात करिअर करण्यासाठी अगदी पहिलीपासून कशा प्रकारे शैक्षणिक संधी आहेत,



शिवाजी विद्यापीठातून...

याची तपशीलवार माहिती दिली. ते म्हणाले, जिथे जिथे संरक्षणविषयक क्षेत्रे, कार्यालये आहेत, अशा कॅन्टोन्मेंट क्षेत्रामध्ये आर्मी, नेव्ही, एअर फोर्स यांच्या शाळा असतात. अशा शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येतो.

केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

# रोजगार प्राप्तीसाठी हिंदी भाषा महत्त्वाची : प्रा. भीमराव पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रोजगार प्राप्तीसाठी आजच्या काळात प्रत्येकाने हिंदी भाषा शिकायला हवी, असे प्रतिपादन सांगली येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. भीमराव पाटील यांनी केले.

विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या वतीने 'उच्चशिक्षण व रोजगाराच्या संधी' या विषयावरील ऑनलाईन करिअर मार्गदर्शन पंधरवडा-२०२१ मधील 'हिंदी विषयातून करिअर कसे घडवावे' या व्याख्यानात ते बोलत होते. प्रास्ताविक सहायक प्रा. बबन पाटोळे यांनी केले. सहायक प्रा. पी. एस. कांबळे यांनी आभार मानले.

# विद्यापीठातील विदेशी भाषा अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी रशियन, जर्मन, जपानी, फ्रेंच, पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. ऑनलाईन व ऑफलाईन प्रवेश अर्ज भरण्याची मुदत १ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली आहे.

विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे एक वर्ष कालावधीचे रशियन, जर्मन, जपानी, फ्रेंच व पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात येतात. अभ्यासक्रमांची प्रवेश पात्रता बारावी उत्तीर्ण अशी असून इतर शिक्षण वा नोकरी करत हे अभ्यासक्रम करता येतात. रोज सायंकाळी एक तास याप्रमाणे वर्ग असतात.

भाषांतर, दुभाषी क्षेत्रात व्यापार-उद्योग, पर्यटन, हॉटेल, तसेच सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रांत विविध नोकरीच्या संधी असतात. परदेशात उच्च शिक्षणासाठी त्या-त्या देशाची भाषा अवगत असणे आवश्यक असते. प्रवेश अर्ज www.unishivaji.ac.in/Admission २०२१ वर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागातर्फे डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

# गुणवत्तापूर्ण आशयावर डिजिटल माध्यमांची भिस्त

## विश्वनाथ गरूड; डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डिजिटल माध्यमांतून सध्या गंभीर आशय तयार होत नाही; परंतु यापुढील काळात गुणवत्तापूर्ण आशयावरच माध्यमांची भिस्त असेल, असे मत पुणे येथील डिजिटल माध्यम अभ्यासक विश्वनाथ गरूड यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन व्याख्यानात बोलताना विश्वनाथ गरूड.**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे 'कोरोनानंतरचा डिजिटल मीडिया' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी गरूड म्हणाले, ग्रामीण भागात इंटरनेटचा वापर वाढल्याने नजीकच्या काळात डिजिटल माध्यमांचा वापर वाढणार आहे. या माध्यमांनी ज्ञान आणि विचार देण्याचे काम जाणीवपूर्वक केले, तरच समाज त्यांच्याकडे गांभीर्याने बघेल. लोकांना घाबरवणे, थिल्लर माहिती देणे अशा गोष्टींपासून डिजिटल माध्यमांनी दूर राहावे. गंभीरपणे विचारपूर्वक आशयाची निर्मिती केली, तरच या माध्यमांना भवितव्य आहे. यापुढील काळात केवळ चांगला आशय असून उपयोग नाही, तर त्याला तंत्रज्ञानाची जोड आवश्यक असणार आहे.

डिजिटल माध्यमांना बाजारस्नेही धोरण स्वीकारणे अपरिहार्य आहे. परंतु, बाजाराच्या किती आहारी जायचे, याचा विचार त्यांना करावा लागेल. व्यवसाय व कर्तव्य यांच्यात मेळ साधणे आवश्यक आहे. कोरोनानंतर डिजिटल माध्यमांतील अनिश्चितता व अस्थिरता कायम राहणार आहे. त्यामुळे या माध्यमांत करिअर करताना अस्थिरतेचा विचार करणे आवश्यक आहे. यापुढील काळात व्हिडीओ व ऑडिओचा आशय वाढणार आहे. दृश्य स्वरूपातील आशयाची मागणी सातत्याने वाढत आहे. यासाठी डिजिटल माध्यमांनी व्हिडीओ किंवा पॉड कास्टिंगकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. उत्तम गुणवत्ता असलेला आशय निर्माण झाला, तरच वर्गणी भरून लोक डिजिटल माध्यमांकडे आकर्षित होतील. अन्यथा या माध्यमांचे आर्थिक सक्षमीकरण होणार नाही. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले.

# गुणवत्तापूर्ण आशयावर डिजिटल माध्यमांची भिस्त : गरुड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डिजिटल माध्यमांतून सध्या तितकासा गंभीर आशय तयार होत नाही; परंतु यापुढील काळात गुणवत्तापूर्ण आशयावरच या माध्यमांची भिस्त असेल, असे मत पुणे येथील डिजिटल माध्यम अभ्यासक विश्वनाथ गरुड यांनी गुरुवारी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने 'कोरोनानंतरचा डिजिटल मीडिया' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. गरुड म्हणाले, ग्रामीण भागात इंटरनेटचा वापर वाढत आहे. नजीकच्या काळात डिजिटल माध्यमांचा वापरही तेथे वाढणार आहे. तथापि, या माध्यमांनी ज्ञान आणि विचार देण्याचे कामही जाणीवपूर्वक केले पाहिजे, तरच समाज त्यांच्याकडे गांभीर्याने बघेल. लोकांना घाबरवणे, थिल्लर माहिती देणे अशा गोष्टींपासून डिजिटल माध्यमांनी दूर राहिले पाहिजे. गंभीरपणे, विचारपूर्वक आशयाची निर्मिती केली तरच या माध्यमांना भवितव्य आहे. यापुढील काळात केवळ चांगला आशय असून उपयोग नाही, तर त्याला तंत्रज्ञानाची जोडही आवश्यक आहे.



**कोल्हापूर : डॉ. सुनीता चव्हाण लिखित 'वेदनेची गर्भनाळ' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, आशा शिंदे, सुषमा शितोळे, रवींद्र खैरे आदी.**

# 'वेदनेची गर्भनाळ' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**कोल्हापूर :** मानवी भाव-भावनांचे आणि नैसर्गिक जाणिवांचे विलोभनीय दर्शन घडवणारी कविता म्हणजे 'वेदनेची गर्भनाळ' हा काव्यसंग्रह असल्याचे मत समीक्षक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. डॉ. सुनीता चव्हाण लिखित व विनय पब्लिकेशन प्रकाशित या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. डॉ. बी. एम. हिर्डेकर अध्यक्षस्थानी होते. संवेदनाचा भावकल्लोळ, मानवी जीवनाची गुंतागुंत, जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास मांडणाऱ्या या कविता आहेत. स्त्री विशिष्ट अनुभवाकडे वेगळ्या दृष्टीने पाहायला लावणारा हा काव्यसंग्रह असल्याचेही डॉ. शिंदे म्हणाले. स्त्री-पुरुष नात्यातील अनेक भावबंध उलगडणारी ही कविता नात्यातील जबाबदारीचे भान करून देते. निसर्गाशी जोडून घेणारी ही कविता वर्तमानालाही कवेत घेते, असे मत डॉ. हिर्डेकर यांनी व्यक्त केले. राजाराम चव्हाण, आशा शिंदे, सुषमा शितोळे, संतोष पाटील, रवींद्र खैरे, रेश्मा खैरे आदी उपस्थित होते. सुनील चव्हाण यांनी स्वागत केले. रत्नदीप कर्णिक यांनी प्रास्ताविक केले. प्रा. राजेश पाटील यांनी परिचय करून दिला. प्रदीप बोभाटे यांनी आभार मानले.

# हवामान बदलाचा धोका बर्फाळ प्रदेशांना सर्वाधिक

## डॉ. कुलकर्णी; सावधगिरीची पावले उचलण्याची गरज

**टेंबलाईवाडी, ता. २३ :** हवामान बदलांचा सर्वाधिक परिणाम बर्फाळ प्रदेशावर होतो. बर्फ वितळून उद्‌भवणाऱ्या आपत्तीला येत्या ३० ते ५० वर्षांत आपणास सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे मानवाने हवामान बदलांची दिशा ओळखून सावधगिरीची पावले उचलण्याची गरज आहे, असे प्रतिपादन बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे (आयआयएससी) शास्त्रज्ञ डॉ. अनिल कुलकर्णी यांनी काल (ता. २२) येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनॅबिलीटी स्टडीज'तर्फे 'हवामान बदल व शाश्‍वत विकास' या विषयावरील व्याख्यानमाला



आयोजित केली आहे. पहिले पुष्प गुंफताना 'तापमानवाढ व जलस्रोतांवर होणारा परिणाम' या विषयावर डॉ. कुलकर्णी बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, की हिमालयात अनेक पर्वतरांगा आहेत, ज्यात शिवालिक, पीर पंजाल, ग्रेट हिमालय, काराकोरम अशा पर्वत रांगांचा समावेश होतो. पैकी दक्षिणेकडील शिवालिक पर्वत रांग वगळता इतर पर्वत रांगांमध्ये प्रामुख्याने बर्फ आढळतो. उत्तर भारतात सिंधु, गंगा व ब्रह्मपुत्रा या प्रमुख नद्यांची खोरी आहेत. हवामान बदलामुळे या नद्या मोठ्या प्रमाणात प्रभावित होतात. १९६० पर्यंत भारताच्या इतर भागाशी तुलना करता हिमालयीन क्षेत्र थंड होते. पण जसा ग्लोबल वॉर्मिंगचा प्रभाव वाढत गेला तसे हिमालयीन क्षेत्रामधील तापमान वाढत गेल्याचे दिसून येते. समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रशांत पाटील, सुधीर पोवार व अभिजीत पाटील यांचे तांत्रिक सहकार्य लाभले.

तरुण भारत

# विद्यापीठातील अभ्यासिका तबब्ल पावणेदोन वर्षांनी खुली

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रातर्फे मुख्य अभ्यासिका व स्टडी सेंटर अभ्यासिका ५० टक्के क्षमतेने बुधवारपासून सुरू करण्यात आली आहे. गेल्या पावणेदोन वर्षांपासून बंद असलेल्या अभ्यासिकांमध्ये बुधवारी विद्यार्थ्यांनी अभ्यास करीत आनंद व्यक्त केला. तसेच अभ्यास कोठे करायचा हा विद्यार्थ्यांसमोरचा प्रश्न मार्गी लावल्याच्या भावना व्यक्त करीत, विद्यापीठ प्रशासनाचे आभार मानले.

विद्यापीठात अभ्यासाला येणाऱ्या विद्यार्थ्यांना कोव्हॅक्सीनचे दोन डोस झालेत की नाही याची खात्री करूनच अभ्यासिकेत प्रवेश देण्यात आला. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मधील प्रवेशशुल्काच्या पावतीचीही खातरजमा करण्यात आली. विद्यापीठाने

- **विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे मानले आभार**
- **लस घेतलेल्यांनाच प्रवेश**

अभ्यासिकेची स्वच्छता, सॅनिटायझेशन आणि सोशल डिस्टन्स ठेवून बैठक व्यवस्था केली आहे.

**लसीकरण पूर्ण झाले पाहिजे**

कोरोना लसीचे दोन डोस पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत प्रवेश दिला जाईल. विद्यापीठाच्या अभ्यासिकेत ८०० विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था आहे. ५० टक्के क्षमतेने सध्या ४०० विद्यार्थी अभ्यास करू शकतात. अभ्यासिका सुरू झाल्याचे परिपत्रक सर्व अधिविभागांना पाठवण्यात आले आहे. तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

**डॉ. नमिता खोत** (संचालिका, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र)